वृत्तमानस
मराठी अस्मितेचा बुलंद आवाज!

NIRAMAYA HOSPITALS
MAY ALL BE HEALTHY

**NIRAMAYA HOSPITALS**
**Publication:** Vrittamanas
**Main Edition:**
**Date:** 14 June, 2013
**Page No:** 05
**Edition:** Mumbai, Thane, Navi Mumbai, Raigad (Print)

---

# खारघर येथे विनामूल्य 'स्थूलता निवारण' चर्चासत्र

नवी मुंबई, दि. १४ : आजच्या धावपळीच्या जीवनात स्थूलता ही खूप मोठी व गंभीर समस्या होऊ लागली आहे. आधुनिक समाजाला भेडसावणाऱ्या अनेक आजारांचा संबंध स्थूलत्वाशी आहे. पैसा, नोकरी, शिक्षण इत्यादी कामांसाठी सतत धावणारी मुंबई ही लठ्ठपणातही आघाडीवर आहे. लठ्ठ व्यक्तीमध्ये स्थूलता, वाढत जाणारे वजन आणि आहार याविषयी बरेच गैरसमज आहेत. लठ्ठपणा नक्की कशामुळे येतो, त्यामुळे आपल्या आरोग्यावर कोणते दुष्परिणाम होतात, आणि तो कमी करण्याच्या योग्य उपचार पद्धती याबाबत योग्य मार्गदर्शन लेप्रोस्कोपी व एनडोस्कोपी थेरॉपेटिक तज्ज्ञ डॉ. अमित थडानी यांनी निरामय रुग्णालयातर्फे खारघर येथे 'स्थूलता निवारण'. या विषयावर विनामूल्य चर्चासत्र आयोजित करण्यात येत आहे. हे चर्चा सत्र शनिवार १५ जून रोजी निरामय रुग्णालय, प्लॉट क्र.५ ए,सेक्टर ४, बाल भारती शाळेच्या बाजूला, खारघर येथे सायंकाळी ३ ते ४ या वेळेत आयोजित केले आहे. यामध्ये ज्यांचे वजन ९० किलो किंवा त्यापेक्षा जास्त आहे ,व ज्यांना या आजाराबद्दल अधिक माहिती जाणून घ्यावयाची आहे, असे लोक सत्रात सहभागी होऊ शकतात. या सत्रात सहभागी होण्यासाठी ९८२०३३२५१५ या क्रमांकावर संपर्क साधून आपले नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे.

Before You Speak
communications